# कार्यालय नगर परिषद, ब्रम्हपुरी (जिल्हा-चंद्रपूर)

**MUNICIPAL COUNCIL BRAMHAPURI DIST-CHANDRAPUR**

Email :- conagarparishad@gmail.com Phone. 07177-272013

क्रमांक : जा.क्र. नपब्र/नियोजन व विकास2022/307 दिनांक :- 15/11/2022

प्रती,

मा. दुय्यम निबंधक
ब्रम्हपुरी

विषय :- मौजा- ब्रम्हपुरी भूमापण क्र. ३०५ आराजी १.८२ हे. आर. चे अभिन्यासमधील नगर परिषदेकडे विकास कामाकरीता राखून ठेवण्यात आलेले असलेले भुखंड मुक्त करणेबाबत.

संदर्भ :- १. या कार्यालयाचे आदेश क्र./नपब्र/नियोजन/अकृषक/२०२१/३००, दिनांक ०६/०५/२०२१
२.मा. नगररचनाकार चंद्रपूर यांचे सिमांकीत अभिन्यास अंतिम मंजुरी शिफारस क्र. १२८१, दि. २२/०६/२०२१
३. अभिन्यासधारक अशोक किसनलाल भैय्या व इतर १ यांचे या कार्यालयात प्राप्त अर्ज दिनांक १२/०४/२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, नगर परिषद क्षेत्रातील मौजा- **ब्रम्हपुरी** येथील भूमापण क्र. **३०५** आराजी **१.८२ हे. आर.** चे अभिन्यासास या कार्यालयाकडून संदर्भिय आदेश क्र. १ अन्वये रहिवास व वाणीज्य प्रयोजनार्थ विकास करण्यास मंजुरी देण्यात आले असून, मा. सहाय्यक संचालक नगररचना चंद्रपूर यांचे संदर्भिय आदेश क्र. २ अन्वये अभिन्यासला अंतिम मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

सदरहू अभिन्यासमधील अंतर्गत रस्त्याचे खडिकरण करणे, व सार्वजनिक विद्युतची व्यवस्था करण्याचे कामाची हमी म्हणून अभिन्यासधारकाने त्यांचे भूमापण क्र **३०५** चे अभिन्यासमधील भूखंड क्र. **१६** संदर्भ क्र. १ मधील आदेशातील अट क्र. १७ अन्वये अभिन्यासचे विकास कामाकरीता न. प. कडे राखून ठेवण्यात आले होते.

अभिन्यासधारकाने भूमापण क्र. **३०५** चे अभिन्यासमधील अंतर्गत रस्त्याचे खडिकरण, नाली व सार्वजनिक विद्युतची व्यवस्था करण्याचे काम पूर्ण केले असल्याने, सदरहू कामाची हमी म्हणून अभिन्यासधारकाने राखून ठेवलेल्या भूमापण क्र. **३०५** चे अभिन्यासमधील भूखंड क्र. **१६** मुक्त करण्यात येत असून, सदर भुखंडाची विक्री करण्यास नगर परिषदेची हरकत नाही.

सबब कळविण्यात येत आहे.

मुख्याधिकारी
नगर परिषद, ब्रम्हपुरी

प्रतिलीपी :-

श्री. अशोक किसनलाल भैय्या व इतर १ रा. ब्रहपुरी यांना माहितीस रवाना.

मुख्याधिकारी
नगर परिषद, ब्रम्हपुरी